ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 4 | DECEMBER-2021

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# नारायणचिं चोली: एक धार्मिक पर्यटन स्थळ




प्रा.डॉ.रविकिरण जाधव[1] आणि श्री. ज्ञानेश्वर सतिश झरकर[2]
[1]विभाग प्रमुख, प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृती,
दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.
[2]पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, सामाजिकशास्त्रे संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर.

## प्रस्तावना:-

मानवी इतिहास हा प्रागैतिहास अणि इतिहास या दोन भागात विभागला गेला आहे. ज्या कालखंडाचा लेखी इतिहास उपलब्ध आहे, त्या कालखंडास ऐतिहासिक कालखंड असे म्हणतात. आणि ज्या कालखंडामध्ये मानवाला लिहिण्याचे ज्ञान अवगत नव्हते त्या कालखंडास प्रागैतिहासिक कालखंड असे म्हणतात. मानवाला लिखानाची कला ही फक्त पाच हजार वर्षापूर्वी अवगत झाली होती. यावरून आपणास समजते की प्रागैतिहासिक कालखंड हा किती मोठा होता. (देगलूरकर गो.ब.; 14: १९७३ प्राचीन भरतीय इतिहास आणि संस्कृती).

भारतामध्ये आश्मयुगापासूनच मानवी जीवनाचा पुरावा मिळतो. मध्य प्रदेशमधील हथनोरा या ठिकाणी नर्मादा नदीच्या काठी अरूण सोनकिया यांना रामापिथेकस मानवाच्या कवटीचे जीवाश्म मिळाले. तर मध्याश्मयुगाचा पुरावा गुजरातमध्ये लांघनाज, पंश्चिम बंगाल मध्ये बिरभानपूर व राजस्थानात बागोर येथे उपलब्ध झाला आहे. तर नवाश्मयुगाचा पुरावा काश्मीर, आंध्र प्रदेश, व पूर्व भारतात मिळाला आहे. त्यानंतर येणारी ताम्रपाषाणयुगीन संस्कृती ही हरप्पन संस्कृतीशी जोडलेली आहे. त्याबरोबरच जोर्वे, इनामगाव व नेवासे या ठिकाणीसुध्दा ताम्रपाषाणकाळातील संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत. नंतर येणाऱ्या लोहयुगाचे अपशेष चिरांद (बिहार), सोनपूर (बंगाल) इथे सापडतात. तसेच महाश्मयुगीन कालखंडातील सापडणा-या अनेक कलात्मक वास्तू, मूर्ती पूर्णात्मक अवस्थेत, जीर्ण, विदीर्ण अवस्थेत किंवा अवशेषात्मक

स्वरूपात आढळतात. प्राचीन लेणी, मंदिरे, स्तुप, विहार, कुंड, शिलालेख, नाणी, अलंकार, भग्न अवशेष आपणास पहावयास मिळतात. (पाटील एम.जे.; पुरातत्त्वः २०११; 1).

महाराष्ट्रामध्ये साधारण ४ थ्या व ५ व्या शतकामध्ये मंदिरे बांधणीस सुरूवात झाली असावी. यावेळी महाराष्ट्रात प्रामुख्याने उत्तर चालुक्यांची राजवट होती. महाराष्ट्रात नागर व द्रविड शैली ऐवजी भूमीज या नावाने ओळखली जाणारी मंदिरवास्तू शैली निर्माण झाली. भूमीज शैलीतील मंदिरे बहूधा निरंधार असतात. म्हणजेच प्रदक्षिणा मार्ग उघडा असतो. गाभारा आतून चौरस व बाहेरून नक्षत्राकृती किंवा षटकोनी असतो. गाभाऱ्यासमोर अंतराळ आणि अंतराळासमोर बहुधा तीन बाजुनी उघडा असणारा मंडप ही मंदिराची प्रमुख अंगे असतात. मंडपाच्या तीनही बाजूंना प्रवेशव्दार असून त्यावर लहान मोठे अर्धमंडप किंवा भद्र बांधण्यात आले आहे. मंदिराच्या भिंतीवर आडवे ठळक थर असतात. गाभाऱ्याच्या बाहेरच्या भिंतीवर चारही दिशांकडे तोंड करून देवकोष्ठे असतात. त्यांना सामावून घेणारी रथ मंदिराच्या पायऱ्यापासून ते अमलकापर्यंत सलग व अखंड असतात. शिखराच्या निम्या उंची इतका समोरच्या बाजूस शुकनास असते. त्यावर चौथा रथ येतो. जंघेवर मूर्तीकामाच्या पट्या दिसतात. त्यामधील देवमूर्ती, अप्सरा, व्याल या सारखी पारंपारिक रूपके वापरली आहेत.

महाराष्ट्राच्या बहुतेक सुस्थितीत प्राचीन मंदिरे उत्तर चालुक्य आणि यादव शिलहारांच्या राजवटीत बांधली गेली. ११ व्या व १२ व्या शतकामध्ये यादव कालीन हेमाडपंथी या नावाने ओळखली जाणारी अनेक मंदिरे महाराष्ट्रात बांधली गेली. हेमाडपंथ शैली नागर शैलीचेच बदलेले स्वरूप होते.

## उद्दिष्टे

1) प्राचीन मंदिरांचा शोध घेणे.
2) मंदिरावरील मूर्ती आणि शिल्पांचा सखोल अभ्यास करणे.
3) मंदिरातील मूर्ती आणि शिल्पकलेवरून त्यांचा कालखंड ठरविणे.

## संशोधन पध्दती:-

या शोध निबंधामध्ये क्षेत्रीय सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केलेला आहे. याबरोबरच माहिती संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे.

## प्राथमिकस्त्रोत:-

1) संपूर्ण गावाचे सर्वेक्षण करून मूर्ती आणि शिल्पकेलेचा शोध घेणे.
2) मूर्ती आणि शिल्पकेलेचे छायाचित्रे आणि मोजमापे घेऊन सुक्ष्म अभ्यास करणे.

3) **सूक्ष्म निरिक्षण आणि विश्लेषण.**

## दुय्यम स्त्रोत:-

**विविधि ग्रंथालयात जाऊन संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करून संबंधीत शोध निबंधासाठी संदर्भ घेण्यात आला आहे.**

**या प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांव्दारे गोळा केलेल्या माहितीचे परिक्षण, वर्गीकरण, सांकेतीकरण, व निष्कर्ष काढण्यात आला आहे.**

**मर्यादा:-** **नारायणचिंचोली या गावापूरतेच हे संशोधन मर्यादित आहे.**

**नारायणचिंचोली (१७°४३'४२.५७" उत्तर, ७५°२२'४९.२६"पूर्व) हे गाव सोलापूर जिह्यातील पंढरपूर तालुक्यात आसून पंढरपूर पासून १५ किमी अंतरावर तर सोलापूरहूनहू६५ किमी. अंतरावर आहे. या गावामध्ये सुर्यनारायण नावाने ओळखले जाणारे एक मंदिर आसून, या मंदिरावरूनच या गावाचे नाव नारायण चिंचोली पडले असावे. या मंदिराशेजारीच एक जीर्ण आवस्थेत असलेले मंदिर असून ते शिव मंदिर आहे. नारायणचिंचोली या ठिकाणी पोहोचण्यासाठी पंढरपूर बसस्थानकातून दर एक तासाला बस उपलब्ध आहेत.**

## सुर्यनारायण मंदिर

**सुर्यनारायण मंदिर हे नारायणचिंचोली गावाच्या काहीसे बाहेर आहे. हे मंदिर २.५ मी. अधिष्ठानावर उभे आहे. मंदिराची संपूर्ण लांबी २९ मी. तर रुंदी १६ मी. आहे. सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी एकंदरीत या मंदिराची रचना आहे.**

**या मंदिराचे विधान नक्षत्राकृती आहे. मंदिराच्या आतील व बाहेरील भागावर नक्षीकाम आढळून येत नाही. मंदिराचे प्राचीन शिखर पडलेले असून सध्या गावकऱ्यांनी नवीन शिखर बांधले आहे. तसेच मंदिराच्या सभामंडपावरील काही भाग हा पडलेला असल्यामुळे याही ठिकाणाची डागडुजी केलेली आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूस मंदिराचे पडलेले अवशेष इतरत्र विखुरलेले आहेत. यामध्ये कीर्तिमुख विरगळ, कळस, शिलालेख तसेच इतर मंदिराचे अवशेष दिसून येतात. मंदिराच्या आतील भागात म्हणजेच सभामंडपामध्ये काही मूर्तीशिल्पे आहेत. यामध्ये गजलक्ष्मी, विष्णू (केशव), शिव, सर्पदंपत्ती, आहेत. संपूर्ण मंदिर हे काळापाषाण (बसाल्ट) या दगडापासून बनविले गेले आहे.**

## सभामंडप:

**सभामंडपात प्रवेश करण्यासाठी दोन पायऱ्या चढून जावे लागते. सभामंडप १५ x १५ मीटर लांबीचा आहे. याच्या माधोमध २.७० X २.७० मीटर रंगशीला असून तिच्या चारी कोपऱ्यात चार स्तंभ आहेत.**

**सभामंडपाच्या डाव्या, उजव्या तसेच प्रवेशव्दाराच्या आतील दोन्ही बाजूस बसण्यासाठी कक्षासन आहेत. या कक्षासनमध्ये एकूण १२ अर्धस्तंभ आहेत. सभामंडपाची उंची ११ मीटर च्या आसपास आहे. सभामंडपामधील स्तंभावार कक्षासनाची उंची सभामंडपातील जमिनिपासून २.५ मीटर आहे. सभामंडपामधील स्तंभावार कोणतेही नक्षीकाम आढळून येत नाही. सभामंडपामध्ये गाजललक्ष्मी, सर्पदंपत्ती आणि विष्णू प्रतिमा आहेत.**

## सभामंडपामधील स्तंभः

**सभामंडपामधील स्तंभाचे पीठ चौकोनी असून त्याच्या चारही बाजूस त्रिकोणी आकाराचे नक्षीकाम केलेले आहे. त्यावरील भाग उभा आयताकार आसून त्यावर कोणतेही नक्षी नाही. त्यावरील भाग हा अष्टकोणी आहे. त्यावर वर्तुळाकार भाग आसून परत अष्टकोणी भाग आहे. त्यानंतर स्तंभमध्याचाभाग येतो. त्यानंतर वर स्तंभशीर्ष आहे.**

## सभामंडपाचे वितानः

**सभामंडपातील वितान हे नावतल प्रकारात मोडणारे आहे. या नवतल वितानामध्येसर्वात खालील बाजूस चार शिळा त्यानंतर त्यावर पुन्हा चार शिळा आणि सर्वात वरील बाजूस गोल आकाराचे नक्षीकाम असलेले शिळा ठेवण्यात आली आहे.**

## अंतराळः

**सभामंडपानंतर अंतराळ आहे. अंतराळाला दोन अतिरिक्त स्तंभाने आधार देण्यात आलेला आहे. मंदिराचे अंतराळ साध्या पद्धतीचे असून कोणत्याही प्रकारचे नक्षीकाम तसेच देवकोष्ठ नाहीत. वितान हे नवतल प्रकारामध्ये मोडणारे आहे. तसेच गर्भगृहात प्रवेश करण्यासाठी असेलेल्या व्दारशाखेवर नक्षीकाम केलेले दिसून येत नाही. व्दारशाखेच्या दोन्ही बाजूस स्तंभ कोरलेले असून त्याच्यावर भौमितीक नक्षीकाम केलेले आहे. अंतराळ हे ५ × ५ मीटर लांबीचे आहे.**

## गर्भगृह-

**गर्भगृहचौरसाकृती असून तो ५ × 5 मीटर लांबीचा आहे. गर्भगृहाचे प्रवेशव्दार मोठे असून त्याची उंची ५ मीटर तर रूंदी २.५ मीटर आहे. प्रवेशव्दाराच्या व्दारशाखेवर गणेशाचे अंकण आहे. भिंती सपाट आहेत. त्यावर नक्षीकाम अथवा देवकोष्टे नाहीत. चारी कोप-यास भिंतीतीत स्तंभ आहेत. गर्भगृहाच्यामधोमध २ × 2 मीटरचा पीठ आहे. या पीठावर विष्णूची केशव रूपात मूर्ती आहे.**

**कालखंड:-**

**मंदिराच्या एंकदरीत रचनेवरून या मंदिराचा कालखंड हा उत्तर चालूक्य किंवा यादव कालखंडातील असावा असे वाटते. कारण मंदिरामधील गर्भगृहामध्ये असलेली सूर्यनारायणाची प्रतिमा ही अतिशय सुरेख आणि अलंकरणाने युक्त अशी आहे. अशा प्रकारची कलाकृती ही चालुक्य कालखंडात आपणास बघावयास मिळते. याचे उदाहरण आपणास उमरगा, निलंगा इ. ठिकाणी असलेल्या शिवमंदिरांवरून दिसून येते. तसेच या मंदिराचे विधान हे नक्षत्राकृती आहे. याचबरोबर**

**संदर्भ :**

1) **खरे ग.ह. : मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे १९३९.**
2) **ढवळीकर म. के. : सिंधु संस्कृती कोणे एके काळी, राजहंस प्रकाशन, पुणे, २००६.**
3) **ढेरे रा. चिं. : विठ्ठल एक महासमन्वय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९८४.**
4) **देगलूरकर गो. ब. : विष्णुमूर्ते नमस्तुभ्यंम्, श्रीव्दारकाधीश चॅरिटीज, कर्नाळा, जि. - रायगड, २००७.**
5) **देव शां. भा. : पुरातत्वविद्या, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७६.**
6) **पाटील माया: मराठवाड्यातील काही मंदिर शिल्पे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. २०१४**